
१८२४
म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. क्र. ३८४
3८8
REFBK-0002814
REFBK-0002814

य इतिहास
. नं. ३६४

# ...कालीन

# ...तिहासिक रत्नें



REFBK-0002814
REFBK-0002814

शिक्ष... ...पुणें.

सन १९२५

किंमत १।। आणा

हें पुस्तक शंकर रामचंद्र दाते यांनीं आपल्या लोकसंग्रह छापखान्यांत, २७ बुधवार पेठ, पुणें शहर येथें छापिलें.

२०७८

# प्रस्तावना

प्राथमिक शिक्षणाच्या शाळेंतून अभ्यासाशिवाय मुलांना वाचनाची गोडी लागावी म्हणून, लायब्ररी वाचनाचा तास ठेवण्यांत आलेला असतो. वाचनास योग्य अशीं म्हणजे नीतिपाठ, ऐतिहासिक, धार्मिक इत्यादि विषयांचीं पुस्तकें योजिलीं जातात. यामुळें त्यांचा वाचनविषय चांगला होऊन व ज्ञानांत अधिक भर पडून त्यांची जिज्ञासा शक्ति वाढते यांत बिलकुल संशय नाहीं. अशा पुस्तकांचा भरणा जितका जास्त, तितका तो फायदेशीरच होईल.

सदरहू पुस्तकांत शिवकालीन ऐतिहासिक दोन गोष्टी दिल्या आहेत. (१) गागाभट्ट काशीकर हें नाव कसें पडलें? या विद्वान ब्राम्हणाकडून शिवाजीनें आपणास राज्याभिषेक करविला, एवढीच माहिती मुलांस मिळते. पण गागाभट्ट नांव कसें पडलें; त्यांची विद्वत्ता केव्हां वाढली? त्यांस आपल्या आचरणाचा पश्चाताप कसा झाला? त्यांनीं समर्थांचे शिष्यास शाप दिला असतां; स्वामिच्या ठिकाणीं शिष्याचें किती निःसीम प्रेम होतें? वगैरे माहिती दिली आहे. (२) शंभुराव काटकर हें नांव मुलांना खात्रीनें माहित नसावें. लग्नाच्या वरातीमधील कांहीं मंडळी आपलीशीं करून घेऊन शिवाजीनें निवडक लोकांनिशीं त्यांत मिसळून नंतर मध्यरात्रीच्या सुमारास खानाच्या वाड्यावर छापा घातला; आणि खानाची व त्याच्या सैन्याची दाणादाण करून सोडली इतकें सांगण्यांत येतें. पण शिवाजीच्या विरुद्ध कोण कोण प्रयत्न करीत होते? शंभूराव काटकराची शिवाजीच्या पदरीं नौकरी कशा प्रकारची होती? त्याचें सामर्थ्य काय होतें? महाराजांनीं त्याचा कसा उपयोग करून

घेतला? आपल्या शक्तीच्या जोरावर खानाकडे शंभूरावानें नोकरी कशी मिळविली? शंभुराव आणि चाफाबाई या उभयतांच्या संवादांत चाफाबाईनें आपल्या नवऱ्यास दिलेली सल्ला, यावरून तिच्या ठिकाणीं महाराजाबद्दलेंच प्रेम आणि कर्तव्य निष्ठा ही दिसून येते वगैरे माहिती दिली आहे.

दोन्ही गोष्टींचें मूळ संविधानक फारच मजेदार आणि मनोरंजक असल्यामुळें ही माहिती मुलांना वाचण्यास मिळावी या हेतूनेंच छापविण्याचा प्रयत्न केला आहे. सदर माहिती लिहितांना स्वराज्याची स्थापना या पुस्तकाचा मला फार उपयोग झाला. पुस्तकांत निरनिराळया प्रकरणांतून दिली गेलेली माहिती थोड्याफार फरकानें संगतवार जुळविली गेली आहे. तेव्हां सदर पुस्तककर्त्यांचा मी अत्यंत आभारी आहे.

लहान मुलांना उपदेशपर आणि मनोरंजक अशा निरनिराळ्या विषया संबंधाच्या गोष्टी जर निघतील तर त्यांची अत्यंत जरूरी आहे; अशाबद्दलचे प्रोत्साहन आमच्या शाळेचे हेडमास्तर भि. वि. महाजन यांनीं दिल्यावरून मी हा अल्पसा प्रयत्न केला आहे. याजबद्दल त्यांचा मी आभारी आहे. माझे परम स्नेही आणि व्यवसायबंधु मि. व्ही. के. सामक यांनीं सदर पुस्तक छापवून देण्याच्या कामीं जी मदत केली याजबद्दल त्यांचा मी आभारी आहे.

मुलांच्या लायब्ररी वाचन पुस्तकांत ऐतिहासिकदृष्ट्या या छोट्या पुस्तकाची भर पडेल अशी आशा बाळगून मी ही प्रस्तावना पुरी करितों.

तारिख. १५।३।२५

लेखक

# गागाभट्ट काशीकर हें नांव कसें पडलें

छत्रपति शिवाजी महाराज यांचे गुरु श्रीसमर्थ रामदासस्वामी हे महाराजांस कांहीं काळ पावेतों वाईट ग्रहदशा आल्या कारणानें, त्या ग्रहदशेच्या शांतीकरितां आणि पुण्यसंचय होण्याकरितां म्हणून स्वामी तीर्थें करीत करीत निघाले, ते काशी क्षेत्रांत येऊन राहिले. त्यांजबरोबर त्यांची शिष्य मंडळीही होतीच.

नित्याप्रमाणें त्यांचे शिष्य दररोज भिक्षा मागण्यास त्या गांवीं हिंडत असत; प्रत्येक घरीं जातांना 'समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळीं कोण आहे'? इत्यादि श्लोक म्हणत असत; असा क्रम चालला असतां; एके दिवशीं ब्रह्मघाटावरील एका ब्राह्मणाच्या घरीं जाऊन वरील श्लोक म्हणून उभयतां शिष्यांनीं तेथें भिक्षा मागितली. ब्राह्मण घरांत देवपूजेस बसला होता; श्लोक ऐकून तो आश्चर्यचकित झाला. आणि मनाशीं विचार करूं लागला कीं, आजकाल काशीक्षेत्रांत विद्वत्तेनें, मानानें आणि कर्तृत्वानें माझ्यापेक्षां कोणी श्रेष्ठ नसतांना; भिक्षा मागावयाला आलेल्या भिक्षेकऱ्यांनीं आपल्या स्वामींची इतकी थोरवी गावी हें बरें नाहीं. त्याला हें सहन न होउन; तो झटकन उठला आणि बाहेर आला.

ब्राम्हण बाहेर येऊन त्यांस विचारतो; कोणरे तुम्ही? कोणत्या समर्थाचे शिष्य? आणि असा कोण तुमचा गुरु कीं, त्याची लीला तिन्हीं लोकांत वर्णन केली जाते? असें दरडावून विचारलें.

श्लोक म्हणणाऱ्या दोघां शिष्यांपैकीं एकानें तितक्याच जोरानें

उत्तर दिलें. मी श्लोक म्हटला. आम्ही समर्थ रामदासांचे शिष्य आहोंत. त्यावर ब्राम्हण म्हणतो, तूं म्हटलास काय? माझा प्रभाव अद्यापि तुम्हाला समजला नाहीं वाटतें ? पाहा माझें सामर्थ्य! हा दिनमणी अस्तमानाला जातांच यमपाश तुझ्या गळ्यासभोंवतीं पडेल. पाहातों तुझ्या गुरूचें सामर्थ्य काय आहे तें? चला जा निघा.

मग ते उभयतां शिष्य हिरमुष्टी होऊन ठराविक घरांची भिक्षा पुरी होतांच परत आले. आणि झालेली सर्व हाकिगत त्यांनीं समर्थांस सांगितली. स्वामींनीं ती शांत चित्तानें ऐकून घेतली आणि शिष्यांस म्हणाले, कांहीं चिंता न करितां स्वस्थपणानें असा. भिऊं नका. असें सांगून ते आपल्या नित्यकर्मास गेले. दुपारीं भोजनानंतर मठा शेजारच्या एका वृक्षाची छाया पाहून त्या छायेंत आपली पांढरी शुभ्र घोंगडी स्वामींनीं पसरली. सभोंवतीं शिष्य मंडळी बसवून सभोंवार कुबडीनें रेघ आखली. नंतर सर्व शिष्यांस संथा देत आपण मधीं बसले. ब्राम्हणानें ज्यास शाप दिला होता त्यास आपल्या घोंगडीवर बसवून घेतलें होतें; आणि घोंगडी सोडून न जाण्याबद्दल त्यास सांगितलें होतें. कांहीं वेळानें स्वामी निद्रिस्थ झाले. झोपीं जातांना त्या शिष्यास आपली सेवा करण्यास सांगितलें होतें. स्वामी झोंपले आहेत, शिष्य त्यांची सेवा करीत आहे. इतर शिष्यांचें अध्ययनाचें काम चालूच आहे. अस्तमानाची वेळ समीप येत चालली तसें त्या शिष्याचें तोंड सुकून जाऊन केविलवाणा होऊन तो

मनाशीं विचार करूं लागला. आज आपण यमाच्या ताब्यांत जाणार? उगीच आपण या गुरूच्या नादीं लागलों! तथापि कांहीं हरकत नाहीं. गुरूची सेवा मनोभावानें करीत आहे. गुरूची कृपा होईल तर यमाचें काय चालणार आहे? असा मनाचा निश्चय करून तो स्वस्थ होता.

अस्तमान होत आला तरी गुरुजी जागे होत नाहींत; इतकी कशी झोंप लागली आहे कोण जाणें ! शिष्य असा विचार करीत आहे, इतक्यांत त्याला चक्क उजेड झाल्याचा भास झाला; आणि त्या उजेडांत एक भव्य आकृति दिसूं लागली. पण चमत्कार असा कीं, ती आकृति स्वामींनीं आखलेल्या रेघेच्या बाहेरच उभी होती; आणि तेथून त्या शिष्याला आपणाकडे बोलावीत होती. शिष्य त्यांजकडे पाहून म्हणतो. मी तुमच्याकडे येणार नाहीं. कारण घोंगडी सोडून जाऊं नको अशी मला माझ्या गुरूची आज्ञा आहे. तेव्हां आज्ञा मोडून मी तिकडे येणार नाहीं.

असा त्यांचा संवाद सुरू झाला. हा शिष्य कोणाशीं बोलत आहे हें पाहून इतर शिष्यांस आश्चर्य वाटलें. त्यांना ती आकृति दिसेना, पण शिष्य कोणाशीं तरी बोलत आहे हें खास.

इतक्यांत सूर्यास्त झाला. ती आकृति नाहींशीं झाली. गुरुजीही जागे झाले. शिष्यानें घडलेली हकिकत स्वामींस सांगून; माझा मृत्यु टळला असें शिष्य म्हणाला. तुझा मृत्यु टळला, मला मोठा आनंद झाला, असें स्वामी म्हणाले.

समर्थांचे शिष्यास शाप देणारा ब्राह्मण काशीक्षेत्रांत भट्टाचार्य

या नांवानें विद्वान आणि नांवाजलेला असा होता. त्यास अष्टसिद्धी अनुकूल असल्यानें तो त्यांच्या जोरावर काय पाहिजे तें करूं शकत असे. त्यामुळें त्याचें वाटेस कोणी जात नसून उलट त्यास भिऊन वागत असत.

दुसरे दिवशीं भिक्षा मागण्याची पाळी दुसऱ्या दोन शिष्यांची असतांना स्वामींनीं पहिल्या जोडीसच तें काम सांगून; त्या ब्राह्मणांच्या घरीं मुद्दाम जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें ते उभयतां शिष्य गेले. आणि भट्टाचार्यांच्या घरीं जाऊन ठराविक श्लोक म्हणाले.

श्लोक ऐकतांच भट्टाचार्य घरांतून चवताळून बाहेर आले; आणि म्हणाले; अरे कार्ट्यांनों, अद्याप तुह्मी जिवंतच ! त्यांना पाहून ते शिष्य पळूं लागले; आचार्य त्यांच्यामागें लागले. असें होतां होतां शिष्यांनीं मठाची जागा गांठली. स्वामी वाट पाहातच होते. शिष्य धापा टाकीत आले; मागें भट्टाचार्य उघडे बोडखे धावत येत आहेत असें स्वामींनीं पाहिलें भट्टाचार्य रागानें लाल झाला होता; परंतु स्वामींनीं पाहतांच चटकन् थांबला आणि त्यांच्या निश्चल दृष्टीला त्याची दृष्टि मिळतांच जागच्या जागीं उभा राहिला.

स्वामींनी रागानें त्यास म्हटलें; अहो ! भट्टाचार्य, हें काय झालें तें तुमच्या लक्षांत आलेंना ! तुमच्या अंगीं असलेलें अष्टसिद्धींचें सामर्थ्य आजपासून नष्ट झालें, हें लक्षांत ठेवा. तुमच्यासारख्या विद्वानाला सिद्धींचा उपयोग कसा करावा हें समाजावयास पाहिजे होतें. अष्टसिद्धींचीं कार्यें दुसऱ्यावर अपकार करण्यासाठीं नसून; परोपकार करण्यासाठीं असतात; हें तुम्ही विसरलात वाटतें ! तुमची

सिद्धी तर मी काढून घेतलीच, पण तुमच्या विद्वत्तेलाही आजपासून कोणी विचारणार नाहीं. तुम्ही ह्या सिद्धींच्या बलावर कित्येकांना छळलेत, रडविलेत, आणि गागायला लाविलेत. तेव्हां सर्व लोक तुम्हाला इतःपर गागाच म्हणतील.

महाराज, दयाकरा! मी अनंत अपराधी आहें! मला क्षमा करा, मी आपणापुढें अगदीं अज्ञ आहे. असें म्हणून भट्टाचार्यानें स्वामींचें चरण धरिले व मला अभय मिळाल्याशिवाय मी हे चरण सोडणार नाहीं असें म्हणाला.

स्वामी क्षणभर त्याच्याकडे पाहून म्हणाले, उठा! तुम्हाला मी जास्त शिक्षा करूं इच्छित नाहीं! अष्टसिद्धींचीं आठ वर्षे आपल्या विद्वत्तेनें जगावर उपकार करा आणि केलेलें पाप धुवून काढा. खऱ्या पश्चात्तापानें यापुढें वागाल तर आठ वर्षानंतर असा एक प्रसंग येईल कीं, त्यामुळें त्रिखंडांत तुमची कीर्ति होईल. जा.

मुलांनो, या आचार्यांची पुढें चांगल्या आचारणामुळें इतकी प्रसिद्धी झाली कीं या विद्वान् ब्राह्मणाकडून छत्रपती शिवाजी महाराजांनीं आपणास राज्याभिषेक करविला. तेच हे गागाभट्ट काशीकर होत.

# शंभूराव काटकर

बहिर्जी नाईक—कायरे धनाजी, शंभूराव विश्वासू म्हणून शिवाजी महाराजांनीं त्यास पुण्यास ठेविलें. आणि तो तर देशमुख, देशपांडे यांच्या कटांत सामील आहे. याजबद्दल मोठें आश्चर्य वाटतें !

धनाजी——नाईक तुम्ही म्हणतां हें कशावरून, काल प्रत्यक्ष मी पाहिलें आणि; त्यांचा संवाद ही ऐकिला.

धनाजी—काय ! म्हणतां काय नाईक तुम्ही हें !

बहिर्जी—अरे प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिलें, व कानांनीं ऐकलें. बाबाजीराव, होनाप्पा, देशपांडे, कुलकर्णी, राजर्षी आणि शंभूराव काटकर इतकीं मंडळी महाराजांविरुद्ध खलबत करीत बसली होती. ह्या सर्व मंडळींनीं शंभूरावास प्रश्न केला कीं, आम्ही आपला सर्व बेत तुम्हांला कळविला आहे; आतां तुमचा बेत काय झाला तो सांगा. शंभूरावानें उत्तर केलें माझा बेत कायम नाहीं.; कारण तुम्हांला तुमची देशमुखी कायम राखावयाची आहे. तेव्हां तुम्ही खानास सामील होणें योग्यच आहे; पण मी सामील होण्यांत माझा कांहींच फायदा नाहीं. माझें काय कोठेंही चाकरी करून भाकरी मिळवावयाची. तथापि माझा विचार अद्याप कायम नाहीं. असें सांगून तो घरीं जाण्यास निघाला. तेव्हां आतां अगोदर ही बातमी महाराजांस जाऊन कळविली पाहिजे !

शंभूरावाचा स्वभाव अत्यंत चमत्कारिक आणि एककल्ली होता. महाराजांच्या संग्रहीं जीं कांहीं अजस्त्र शक्तीचीं माणसें होतीं त्यांपैकीं हा होता. हत्तीच्या पोटाखालीं मान घालून मानेवर हत्तीला

[stamp]



उचलणें ही त्यांची लीला होती. त्याच्या ह्या राक्षसी शक्तीमुळें त्यास बसावयास घोडा देखील तसाच लागत असे. शहाजीराजे यांचे पुणें प्रांताचे कारभारी दादोजी कोंडदेव यांनीं आपल्या पुणें प्रांताच्या मुलखांत वाघ, लांडगे यांचा मनस्वी उपद्रव असे, तो नाहींसा करण्यास बरकंदाज, आणि निशाण मारणाऱ्या लोकांस बक्षिसांची लालूच दाखवून तो कमी केला. हेंच काम पूर्वीं शंभूराव करीत असे. दररोज १०–२० वाघ, लांडगे मारल्याशिवाय तो जंगलांतून परतच येत नसे. गुणग्राहक शिवाजी महाराजांनीं त्यांला पुढें शिपायाचा पेशा देऊन हळूहळू वर चढवून पुण्यांतील घोडदळांचा एक विश्वासू म्हणून सरदार ठेवला होता.

वरील मंडळींचें खलबत होऊन सायंकाळीं शंभूराव घरीं आला. घरीं येतांच प्रथम मुंडासें एका कोपऱ्यांत फेकून देऊन; कमरेस गुंडाळलेल्या शेल्यांत अडकाविलेली दुधारी लांब पल्ल्याची तरवार काढून ती खुंटीवर लटकाविली. नंतर मांडचोळणा वर करून दारीं ठेविलेल्या डेऱ्यांतील पाण्यानें चूळ भरून व हातपाय धुवून स्वारी जेवणाकरितां पाटावर बसली. त्याच्यापुढें चाफाबाईनें ( बायकोनें ) एका थाळ्यांत जाड वीस भाकरींची चवड, मोठ्या वाडग्यांत कोरड्यास, पशांत मावेल इतका मोठा लसणीचा तिखटाचा गोळा; वीसपंचवीस हिरव्या मिरच्या, आणि १०।१२ कांदे व पाणी पिण्यास थंडगार डेरा असें ठेविलें. जेवणाचा बेत नित्य असाच असे. शिवाय रात्रीं झोपतांना ३ शेर दूध लागतच असे. त्याची बायको चाफाबाई हीही त्याला साजेशीच अशी धिप्पाड आणि

सशक्त होती. ती विहिरीवर पाण्यास गेली असतां ७।८ हांडे सहज एका फेरींत आणीत असे. ३ डोक्यावर, २ कमरेवर, आणि २ हाता-वर अशा रीतीनें एका फेरींतच घरांतील पाण्याची व्यवस्था करीत असे. तात्पर्य तो एक राक्षसी नवराबायकोंचा जोडा होता असें म्हणावें लागेल.

अर्धें अधिक जेवण होत आलें आहे असें पाहून चाफाबाई म्हणाली, मघाशीं बहिर्जी नाईक व धनाजी असे दोघे येऊन आपल्या पागेंतील घोडे घेऊन आम्ही महाराजांस गुप्त बातमी सांगण्यास जात आहों असें आपणास कळविण्यास सांगून ते तसेंच न थांबतां गेले. हें ऐकून शंभूराव मनांत कचरला. आणि म्हणाला धन्य आहे त्या नायकापुढें ! कोठून कशा बातम्या काढील याचा नेम नाहीं.

चाफाबाईनें ही हकीगत सांगतांच शंभूरावाचें जेवणावरील लक्ष उडालें. तो विचारमग्न झाला. देशमुखांनीं खानाला पुण्यांत येण्याबद्दल विनंति केली, एवढेंच नाहीं तर खुद्द महाराजांचा वाडा राहण्यास देण्याचें कबूल केलें, ही फितुरी महाराजांना कळून त्यांत माझें अंग आहे असा त्यांना संशय येईल, हा विचार त्याच्या डोक्यांत एकसारखा घोळूं लागला. जेवण कसें तरी उरकलें, रात्रीं त्यास झोंप येईना. चाफाबाईसही येईना. अशा स्थितींत त्या उभयतांचा संवाद सुरूं झाला तो असा:—

शंभूराव— खान पुण्यांत येणार ही बातमी आतां नाईक महाराजांस जाऊन सांगणार. महाराजांस माझा संशय येणार पण मी कांहीं त्या कटांत नाहीं. मग मला भय काय ?

चाफाबाई—भिण्याचें कारण पुष्कळ आहे ! देशमुख, देशपांडे, कुळकर्णी यांचा हा चाललेला कट तुम्हांला ठाऊक होतानां ! मग महाराज संशय घेणारच. यांत बिलकुल शंका नको.

शंभुराव—बरें जरी ठाऊक असलें तरी मी काय वर्दी देणारा जासूद थोडाच आहे ! मी घोडदळांचा सरदार आहे समजलीस !

चाफाबाई—समजलें. पण आपण महाराजांचीच चाकरी करतांना ! मग महाराजांस त्यांच्या संकटाची वर्दी देणें हें तुमचें काम नाहीं वाटतें ? तुम्हीं आतांचे आतां महाराजांकडे जाऊन वर्दी द्या. म्हणजे त्यांचा संशय दूर होऊन तुम्हीं कामगिरी बजाविली असें होईल.

शंभूरावास बायकोचें सांगणें पटलें. तो झटकन उठला. त्या वेळीं जरी मध्यरात्र उलटून गेली होती, तरी घोड्यावर खोगीर ठेवून सिंहगडाकडे जाण्यास निघाला. सूर्योदयाचे आंत गडावर जाऊन आपण आल्याची वर्दी चाकराकडून महाराजांस देवविली. भेट होतांच शंभुरावानें अदबीनें रामराम करून हात जोडून महाराजापुढें उभा राहिला.

महाराज—कां शंभूराव, आगाऊ खबर द्यावयास आला वाटतें ? इतक्या लवकर कशाला आलांत ? खानानें पुण्यांत येऊन वाड्यांत तळ ठोकल्यानंतर मग यावयाचें होतें ! इतरांप्रमाणें तुम्हींही फितूर झालात वाटतें ?

शंभूराव—नाहीं महाराज ! मी फितुर झालों नाहीं. मी त्यांच्या कटांत नाहीं.

महाराज—मग ही कटाची बातमी तुम्हांस माहीत असूनहि, दूर येऊन कां कळविली नाहींत ?

शंभूराव—महाराज तें काम माझें नसून जासुदाचें होतें.

महाराज—तुम्हीं अन्न कोणाचें खातां ? तुम्हीं स्वतः जासूद नाहीं किंवा हेर नाहीं असें कां तुम्हीं समजतां ! स्वतःलाच यायला पाहिजे असें माझें म्हणणें नाहीं, पण जासूद पाठवून वर्दी देणें हें तुमचें काम आहे कीं नाहीं ?

शंभूराव—अन्न खातों तें ह्या मनगटाचे जोरावर चाकरी करून खातों !

महाराज—ही तुमची शक्तीची घमेंड माझ्यापुढें नको. समजलो तुमची चाकरी ! तुम्हाला ओझीं उचलावयास किंवा लाकडें फोडावयास ठेविलें नाहीं. तुमचा अन्याय तुम्हाला समजत नाहीं. तुम्हांला शक्तीचा अभिमान आहे तो योग्य आहे. पण त्याला युक्तीची जोड पाहिजे. ती तुमच्याजवळ नसल्यानें तुमची शक्ति लंगडी आहे हें लक्षांत ठेवा ! आणि आतां माझ्या सांगण्याप्रमाणें वागून तुम्हीं आपला अन्याय भरून काढला पाहिजे. बोला आहे कीं नाहीं तुमची तयारी ?

शंभूराव—महाराज, क्षमा करा; आणि आतां आपण जें सांगाल तें करण्यास हा शंभुराव एका पायावर तयार आहे हें महाराजांच्या पायाची शपथ घेऊन सांगतों.

महाराज—शत्रूच्या गोटांत जाण्यास सांगितलें तर जाल किंवा नाहीं ?

शंभूराव—ज्याकरितां तुम्ही एथें आहांत त्याच करितां आम्ही दोघे आलों आहोंत.

बाबाजीराव—पण तुम्ही महाराजाकडे गेला होतांना ?

शंभूराव—गेलों होतों. पण त्यांना आमची नौकरी पसंत पडली नाहीं. मी खानालाच फितुर झालों आहें; असा त्यांनीं माझ्यावर आरोप ठेविला. तेव्हां आतां खरोखरीच फितुर होऊन इकडे आलों आहें.

खान—पण; तुम्ही आमच्याकडे नौकरी काय करणार ?

शंभूराव—सांगाल ती, ज्याची भाकरी खावयाची, त्याची चाकरी करावयाची इतकेंच मला कळतें.

होनप्पा—खरें आहे खानसाहेब ! शंभूरावाची नौकरी चोख आहे. खानसाहेबांना शंभूरावाच्या नौकरीचा चांगला उपयोग होईल; कारण ते पुण्याचे पूर्ण माहितगार आहेत.

खान—पण ते आमच्याकडे काम काय करणार ?

शंभूराव—सांगाल तें म्हटलेंना ! ही माझी तरवार ! ह्या माझ्या हातांत आहे ! हा हात वाटेल तें अवघड काम करील. माझ्या दंडांतला जोर दाखवूं ? असें म्हणून बाजूला असलेल्या धनाजीच्या घोड्याजवळ तो बसला आणि; चटकन् घोड्याचे चारी पाय एकत्र करून त्यानें तो घोडा सहज लीलेनें धनाजीसह वर उचलिला.

खान—अरे, ए तो सैतान हय ! ओर ऐसे ऐसे सैतान सीवाजीके पास हय क्यां ? तोबा. तोबा.

खानानें लागलेंच त्यास नौकरीवर ठेवून घेतलें. खानाकडे शंभूरावाची नौकरी सुरू झाली. त्याबरोबर धनाजीचें गुप्त बातमी यंत्र

गडावर सुरू झालें. खानाच्या बैठकींत होणाऱ्या प्रत्येक गोष्टी धनाजी गडावर मोठ्या शिताफीनें पोंचवूं लागला. खानानें पुण्यांत ठेविलेला बंदोबस्त जरी उत्कृष्ट होता तरी; शंभूरावाला पुण्याची खडानखडा माहिती असल्यामुळें धनाजीचा वाटेल तेथें प्रवेश होत होता. जवळ जवळ एक महिना झाला, परंतु खानाच्या अजस्र सेनेला तोंड कसें द्यावें याजबद्दल कोणास कांहीं सुचेना आणि खान तर आपण शिवाजीस शरण आणूंच या विश्वासानें स्वस्थ होता.

खानाचा नकशा कसा उतरावा या एकाच गोष्टीचा महाराजांस ध्यास लागून राहिला होता. शेवटीं त्यांच्या कल्पक बुद्धीनें त्यांना एक साहसाची युक्ति सुचविली. आणि त्याप्रमाणें गुप्तहेराकडून धनाजीस सूचना मिळाली. तेव्हां शंभूराव आणि धनाजी यांनीं खानाची रात्रीं एकांतीं भेट घेतली. खानाला शंभूरावाचा पूर्ण विश्वास पटला होता. त्यामुळें त्यास केव्हांही मज्जाव नसे.

खान—शंभूराव तुमारा क्यां इरादा हय? खानानें हुक्का ओढीत विचारलें.

शंभूराव—माझ्या ह्या पुतण्याचें लग्न कर्तव्य आहे; आणि मी पुण्याचा राहणारा असल्यामुळें पुण्यांतच लग्न करणार आहे. तेव्हां मला वरातीची मिरवणूक शहरांतून वाजत गाजत नेण्याचा हुकूम मिळावा.

खान—क्यूं धनाजी तूम शादी करते हो ? वा: हवा: हमको बहोत खुषी हय. बेशक जाव. पूनेमे शादी करो. और तुमको सब परवाना हय.

शंभूरावाला लग्नाची परवानगी मिळाली. असें महाराजांस कळतांच त्यांनीं आपले पुढले विचार सर्व जुळवून ठरल्याप्रमाणें लग्नाच्या वरातबिरोबर शहरांत आपल्या निवडक लोकांनिशीं प्रवेश करून घेऊन खानाची आणि त्याच्या सैन्याची कशी दाणादाण करून सोडली हें माहितच आहे. त्याजबद्दल निराळें सांगणें नकोच.



2098
REFBK-0002814
REFBK-0002814

# व्ही. के. सामक आणि कं०

## यांचा रूलिंगचा कारखाना

आमचेकडे शाळेच्या स्टोअर्सना व व्यापाऱ्यांना एक्झरसाईज बुकें कापी बुकें बनवून दिलीं जातात. तसेंच शालोपयोगी स्टेशनरी सामान किफायतशीर भावानें मिळतें.

आप्पा बळवंत चौक बुधवार पेठ,
पुणें शहर